# नियमीत दिवाणी मुकदमा क्र. १३०/२०१३ मधील नि. क्र. ७० वरील आदेश

**(दिनांकः ११.१२.२०१७)**

०१. सदरचा अर्ज हा वादीने प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ यांचे वारसांना आदेश २२ नियम ३ प्रमाणे वारस अभिलेखावर आणणेसाठी व आदेश ०६ नियम १७ दिवाणी संहिता प्रक्रिये अंतर्गत वादपत्रात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादीच्या म्हणण्या प्रमाणे प्रतिवादी क्र.३६अ. ही दिनांक २८.७.२०१३ रोजी प्रतिवादी क्र. ४२ हे दिनांक १.६.१९९० रोजी, प्रतिवादी क्र. ४३ हे दिनांक २५.११.१९९८ रोजी व प्रतिवादी क्र. ४८अ हे दिनांक १३.४.२०१४ रोजी मयत झालेले आहेत यापैकी प्रतिवादी क्र. ३६अ चे वारस यापुर्वीच दाव्यात सामील आहे. प्रतिवादी क्र. ४२ व ४३ हे दाव्यापुर्वीच मयत झालेले आहेत. परंतू अनावधानाने त्यांचे वारस दाव्यात सामील करणेचे राहून गेलेले आहे. त्यामुळे त्यांचे वारस दाव्यात पक्षकार म्हणून सामील करणे जरुरीचे झाले आहे. तरी प्रतिवादी क्र. ३६अ तानुबाई भाउ राउत (मयत) वारस दाव्यात पुर्वीच सामील आहेत. प्रतिवादी क्र. ४२ सदाशिव गणपत भंडारे (मयत) चे वारस ४२अ ते ४२क, प्रतिवादी क्र. ४३ सोपान गणपत भंडारे (मयत) वारस ४३अ व ४३ब तसेच प्रतिवादी क्र. ४८अ लक्ष्मण बाळू राउत (मयत) वारस ४८अ१ नाथा लक्ष्मण राउत यांचे वारस असे लिहण्याची परवानगी मागितली आहे व त्यानुसार दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली. सबब, प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ चे वारस अभिलेखावर नोंदवून दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे.

०३. या अर्जास उजर घेत प्रतिवादींनी आपले सविस्तर म्हणणे निशाणी क्र. ७० खाली मांडले. प्रतिवादींच्या म्हणण्या प्रमाणे वादीचा अर्ज खरा नाही. वेळेत वारस अभिलेखावर घेतले नसल्यामुळे हा अर्ज कायदयाने चालू शकत नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावे अशी विनंती

केली आहे.

०४. अर्जातील कथने पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात व त्या प्रत्येक मुदयास आणि निष्कर्षास अनुसरुन उत्तर मी निम्न प्रकारे देत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | प्रस्तावित दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | .....होय |
| ०२. | प्रस्तावित दुरुस्ती केल्यास दाव्याचे स्वरुप बदलणार आहे काय ? | .....नाही |
| ०३. | कोणता आदेश ? | ....अंतिम ओदशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

### मुद्दे क्रमांक १ ते ३ :

०५. दोंन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला. वादीच्या विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, प्रस्तूतचा दावा हा जाहीर होवून मिळणेसाठी व सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी दाखल केलेले आहेत आहे. वादीच्या वकिलांनी प्रतिवादी क्र.३६अ. तानुबाई भाउ राउत ही दिनांक २८.७.२०१३ रोजी, प्रतिवादी क्र. ४२ सदाशिव गणपत भंडारे हे दिनांक १.६.१९९० रोजी, प्रतिवादी क्र. ४३ सोपान गणपत भंडारे हे दिनांक २५.११.१९९८ रोजी आणि प्रतिवादी क्र. ४८अ लक्ष्मण बाळू राउत हे दिनांक १३.४.२०१४ रोजी मयत झाले आहेत असे कथन केले आहे. त्यांच्या मृत्यूचे दाखले नि.क्र. ७३ खाली दाखल केले आहेत. मयताच्या मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ३६अ, ४२, ४३ आणि ४८अ हे मरण पावले तेंव्हा

पासून ९० दिवसाच्या आत मयताचे वारस फलकावर घेवून वादपत्रात समाविष्ट करणे आवश्यक होते. वादीने प्रस्तूतचा अर्ज दिनांक ०२.०२.२०१७ रोजी दाखल केला आहे.

०६. दिवाणी प्रक्रिया संहिता हुकूम ६ नियम १७ चा मुख्य उद्देश न्यायालया समोर येणारे सर्व प्रकरणे गुणावगुणावर चालविणे व सदरची प्रकरणे गुणावगुणान्वर चालविण्यासाठी तसेच दोंन्ही पक्षा मधील खरा वाद ठरविण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबी दुरुस्तीद्वारे वादपत्रात आणणे असा आहे. प्रस्तूत उद्देश लक्षात घेता दोंन्ही पक्षांना योग्य व पुर्ण न्याय देण्यासाठी प्रस्तूतची दुरुस्ती करणे न्यायोचित आहे.

०७. वादीने मागितलेली दुरुस्ती ही त्यांच्या मुख्य दाव्यास अनुसरुन आहे. वादीने मागितल्याप्रमाणे जरी दुरुस्ती झाली तरी ही दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती लिहणे न्यायाच्या समतोल हिताप्रमाणे आवश्यक आहे. तसेच बाहुल्य दावे रोखण्यासाठी प्रस्तूतची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडणेस पुरेशी संधी मिळणार आहे. यासर्व बाबी पाहता मी या निष्कर्षास येते की, सध्य परिस्थितीत परिस्थितीजन्य पुरावा हा वादींच्या हक्कात आहे. परंतू याबाबत दुमत नाही की, वादीस अशी दुरुस्ती वेळेत करण्यासाठी योग्य ती काळजी घेतली नाही व वेळकाढू धोरण अवलंबविले आहे. म्हणून वादींना आदेशित करण्यात येते की, त्यांनी प्रतिवादींना खर्च/कॉस्ट रु. ५००/– दयावे. यासर्व बाबीचा विचार करुन मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी, मुद्दा क्र. २ चे उत्तर नकारार्थी देण्यात येवून मुद्दा क्र. ३ च्या उत्तरा दाखल खालील आदेश पारित करण्यात येते.

## **आदेश**

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. वादीने नियमाप्रमाणे वादपत्रात दुरुस्ती आदेश ०६ नियम १७ दिवाणी संहिते अन्वये नियमाप्रमाणे प्रक्रिया संहिते अन्वये नियमाप्रमाणे या अर्जाचा हुकूम झाल्यापासून १४ दिवसाच्या आत दुरुस्ती करावी.

०३. वादीने प्रतिवादींना खर्च म्हणून रु. ५००/– दयावेत.

०४. वरील आदेशा प्रमाणे हा अर्ज निकाली काढण्यात येते.

**(रोहिणी रा. संकपाळ)**

दिनांक ११.१२.२०१७

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सांगोला

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Kotkunde A.R. |
| (b) | Court | : | Smt. R. R. Sankpal, Civil Judge, J.D.& J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 11.12.2017 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 11.12.2017 |